॥ श्री ॥



## अर्पण - पत्रिका

जीवनभर उन्हाळ्याने साथ केली तरी ज्यांनी भक्तीचा मळा कधीच सुकू दिला नाही, संत-संग व श्रीगुरूंचा सहवास स्वत: करून मलाही करावयास भाग पाडले, त्या माझ्या माता - पित्यांस व संसारात दुर्लक्ष होत असतानाही साधनमार्गाची प्रचीती दृढ करण्यास मदत केली त्या माझ्या पत्नीस व मुलींना ही कृती अर्पण—

॥ श्री ॥

## प्रकाशिकेचे मनोगत

परमार्थविषयावरील वेगवेगळे प्रश्न व त्या प्रश्नांची चिंतनातून निर्माण झालेली उत्तरे आज ग्रंथरूपाने सादर करीत असताना समाधान होत आहे. माझे पती श्री. गुरूनाथ वि. मुंगळे यांची शेकडो प्रवचने व व्याख्याने ऐकण्याचा योग आला. ही व्याख्याने व प्रवचने अक्षरबद्ध करावीत असे मला व त्यांच्या असंख्य मित्रांना वाटत असते. लिहिण्याचा कंटाळा, बोलण्याची आवड व चौकटबद्ध होण्यास नाखूष असलेल्या श्री. मुंगळे यांनी चित्‌शक्तीला अक्षरकोंदणांतून वाहावयास लावले हे मला बरे वाटते.

या पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे काम कै. श्री. पी. सरदार यांनी केले होते. श्री. सरदार यांना भगवंताच्या दरबारातील कुशल कुंचल्यांचा चित्रकार असेच आम्ही म्हणतो. जीवनात भगवंताचा रंग मिसळणारा हा सरदार कलाक्षेत्रात आपल्या हिंमतीने मोठा झाला होता. एका आगळ्याच ढंगाने त्यांनी लोकमानसाचा वेध घेतला होता. प्रा. मुंगळे यांच्या लहरी स्वभावाला पुस्तकात आणण्यासाठी श्री. पी. सरदार

यांची प्रेरणाही कारणीभूत होती.

या पुस्तकातील अक्षरजुळणी, मांडणी व ऑफसेट प्रिंटिंगचे काम श्री. सदाशिव जंगम यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी सुयोग्य रीतीने केल्याबद्दल त्यांचेही आभार. पुस्तकाची मुद्रिते तपासण्याचे काम उत्तम रीतीने केल्याबद्दल श्री. सदाशिव जंगम व श्री. हर्डीकर सर यांचे आम्ही ऋणी आहोत.

या पुस्तकाच्या कामी अनेक लोकांनी नानाविध प्रकारे सहाय्य केले त्याबद्दल त्या सर्वांना धन्यवाद, शेवटी ''बोलविता धनी'' भगवंत असल्याने त्याला स्मरून अशी प्रकाशने आमच्याकडून वारंवार होवोत अशी प्रार्थना करते.

पाडवा चैत्र शुद्ध १
श्री शालिवाहन शके १९२६
तारीख : २१ मार्च २००४

सौ. शैलजा गुरुनाथ मुंगळे
कोल्हापूर.

# - गाभाऱ्यांत -

चैतन्याच्या धारा एकत्रित करून त्यांचा स्त्रोत समाजाभिमुख करीत असताना, आज एक वेगळाच उत्कट आनंद होत आहे. अनादि आणि अनंत अशा ईशतत्त्वाचा ध्यास घेत घेत जीवन व्यतीत करण्याचे १९५७ सालीच ईशसंकल्पानुसार मनाशी ठरविले होते. प्रा. गुरुदेव रानडे यांच्या शब्दातच सांगावयाचे झाल्यास "In God's university one has to be a lifelong student" म्हणजे ईश्वराच्या विद्यापीठात आयुष्यभर विद्यार्थीच राहावे लागते. प्रा. रानडे यांचे हे वाक्य सद्य:स्थितीत परमार्थपथिकांना खरोखरीच त्यातील गूढार्थ लक्षात घेता, एखाद्या अतितेजस्वी दीपस्तंभासारखे मार्गदर्शक आहे. संत मायबाप व जिव्हाळ्याचे असे या पृथ्वीवरील कनवाळू व प्रेमळ मार्गदर्शक व सर्वंकष कल्याण करणारे भूदेवच असल्याने संत चरणाची माती आम्हाला सप्तलोकांत श्रेष्ठ व अतीव मौल्यवान वाटते. प्रा. रानडे यांचे वरील वाक्य हे **सैद्धांतिक पद्धतीचे** असल्याने त्याला शाश्वत असे महत्त्व प्राप्त झाले आहे. ईश्वराच्या विद्यापीठातील विद्यार्थी होऊन नित्य आनंददायी असा देवपथ चालत असताना काळाची जाणीवही होत नाही व मनाचे निर्मन होऊन ''या नरदेहाचे उचित । काही करावे आत्महित ।'' हे समर्थांचे चिरंतन कल्याणकारी शब्द अंत:करणाच्या तारा छेडतात, व जाणीवपूर्वक त्यातील अर्थावर धारणा करीत

साधक भगवंताची पाऊलवाट तुडवत तुडवत मार्ग आक्रमितो. अमर अशा आत्मतत्त्वाचे शिष्यत्व जाणिवेच्या स्तरावर स्वीकारून द्वैतामध्ये बराच काळ लोटला. व्यावहारिक स्तरावर अनेक आपत्तींनी व अडचणींनी रक्तबंबाळ झालो, जगतो का मरतो अशी स्थिती आयुष्यात अनेकदा निर्माण झाली, कित्येकांच्या टीकेचा व उपहासाचा विषय झालो, कित्येकांनी आपल्या कटु वाणीने मनावर प्रहार केले, काही काळ तर इतक्या आपत्ती आल्या की, स्मृतीवरही ताण आला; अशा वेळी जागृती, स्वप्न व सुषुप्तीत भगवान श्रीकृष्णसरस्वती व श्रीनृसिंह - सरस्वती यांच्या चरणकमलाशिवाय दुसरा कोणताही ध्यास नसे. श्रीगुरूंनी आपल्या असीम कृपेने आपली नित्यमंगल व प्रेमरूप छाटी माझ्या अंगावर पांघरून, निजबोधामृत पाजत पाजत साधना चालू ठेवली. अंत:करणात अमृतानंद निर्माण करीत व आदिबीजाचा बोध होत होत, आजही श्रीगुरुप्रेमामृताचे प्राशन चालू आहे व ते असेच चालू रहावे अशी करुणामंगल श्रीगुरूंना कळवळून प्रार्थना करीत आहे.

''**भक्तीस मूळ विरक्ती**'' हे भक्तिमार्गातील लखलखीत सत्य असल्याने ध्येयाशी एकरूप होण्यासाठी, ध्येय विषयाशिवाय अन्य विषय गौण मानले तरच परब्रह्माची प्रचीती येते. याचे चिंतन श्रीगुरुकृपेने सतत होत गेले. आमच्या घराण्यात मल्हारी म्हाळसाकांत हे कुलदैवत असून श्री जगदंब तुळजाभवानी ही कुलदेवी आहे. उपास्य दैवत म्हणून श्रीक्षेत्र नृसिंहवाडी येथील श्रीदत्ताची सेवा अखंड पिढ्यान् पिढ्या चालू आहे. माझे आजोबा कै. नारायण नागेश मुंगळे हे श्रीदत्ताचे उपासक होते. त्यांच्याबरोबर असंख्य वेळा नृसिंहवाडी येथे गेल्याचे मला स्मरते. माझे वडील श्री. विश्वनाथ नारायण मुंगळे हे आजही घराण्याची पारंपारिक व श्रीदत्ताची भक्ती अतिप्रेमाने चालवीत आहेत. बालपणापासून कथा, कीर्तने, प्रवचने व व्याख्याने ऐकणे याचा मला नाद होता. स्मृती तीव्र असल्याने, भगवत्प्रेमाची अभिजात आवड असल्याने व ईश्वरप्राप्ती हेच मनुष्याचे उच्चतम ध्येय आहे याची जाणीव झाल्याने परमार्थवृक्षबीजाची लावणी अंत:करणाच्या सुपीक कप्प्यात त्यावेळीच झाली होती. माझी आई सौ. कमलाबाई विश्वनाथ मुंगळे नेहमी हरिविजय, श्रीज्ञानेश्वरी, श्रीकृष्णविजय, नवनाथ व अनेक संतांची चरित्रे व पोथ्या वाचत असे. तिचे हे वाचन चालू असताना त्यातील अंत:करणात परमोल्हास निर्माण करणाऱ्या रसाळ कथा सांगत असे. अशा कथा ऐकताना कथाविषयाशी